पुढारी



**कोल्हापूर : लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना प्रदान करताना अशोक कुलकर्णी, विनायक कुलकर्णी व गुरूनाथ मिरजगावे आदी. (छाया : पप्पू आत्तार)**

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना 'नारायणी पुरस्कार' प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार-२०१८' आज प्रदान करण्यात आला.

अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर यांच्या हस्ते आणि विनायक कुलकर्णी व गुरूनाथ मिरजगावे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार कुलगुरू डॉ. शिंदे यांना विद्यापीठातील त्यांच्या दालनात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराची रक्कम कुलगुरू डॉ. शिंदे यांनी परत केली आहे. त्याचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांसाठी करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी, हा पुरस्कार राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यासह भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के.डी. कुलकर्णी यांना देण्यात आला आहे.

लोकमत

# देवानंद शिंदे यांना 'नारायणी पुरस्कार'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार-२०१८' सोमवारी कोल्हापूर येथे प्रदान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिंदे यांना त्यांच्या दालनात अशोक नारायण कुलकर्णी (लातूरकर) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विनायक कुलकर्णी, गुरुनाथ मिरजगावे उपस्थित होते. हा पुरस्कार गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. तथापि, पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे कुलकर्णी यांनी सोमवारी कोल्हापूर भेटीदरम्यान त्यांना पुरस्कार प्रदान केला. यापूर्वी हा पुरस्कार राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यासह माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के. डी. कुलकर्णी, आदींना प्रदान करण्यात आला आहे.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना अशोक कुलकर्णी यांच्या हस्ते 'नारायणी पुरस्कार-२०१८' प्रदान करण्यात आला. यावेळी विनायक कुलकर्णी, गुरुनाथ मिरजगावे उपस्थित होते.

# आविष्कार महोत्सवात प्रा. सुतार प्रथम

कोल्हापूर टाइम्स टीम

श्री बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप संचालित अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी, पेठ वडगावच्या प्राध्यापिका शुभांगी सुतार यांनी आविष्कार संशोधन महोत्सव २०१८-१९ स्पर्धेत शेती व पशुसंवर्धन प्रकारात व रिसर्च स्कॉलर गटामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. सुतार यांनी मधुमालती या वनस्पतीचे विविध औषधी गुणधर्म या विषयाचे सादरीकरण केले. ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे घेण्यात आली होती. या संशोधन कार्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विजयसिंह माने, कार्याध्यक्ष मा. श्री. विकासराव माने व मनीषा माने तसेच महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.




आविष्कार संशोधन महोत्सवात शुभांगी सुतार यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

सकाळ




**कोल्हापूर : सक्षम संस्थेतर्फे पारितोषिक वितरण करताना डॉ. अंजली निगवेकर, गिरीश करडे, डॉ. चेतन खारकांडे, सुशांत दाशाळ.**

# सक्षम संस्थेतर्फे पारितोषिक वितरण

**कोल्हापूर :** ब्रेल जयंतीनिमित्त घेतलेल्या ब्रेल लेखन वाचन स्पर्धेचे बक्षीस वितरण सक्षम संस्थेतर्फे करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले डॉ. चेतन खारकांडे अध्यक्षस्थानी होते. 'सक्षम'चे अध्यक्ष गिरीश करडे यांनी प्रास्ताविक केले. ब्रेल लेखन वाचन स्पर्धेत मोठ्या गटात गोखले कॉलेजची विशाखा लांडगेने वाचन स्पर्धेत तर पूनम पुंजाराने लेखन स्पर्धेत प्रथम तसेच लहान गटात विद्यापीठ हायस्कूलच्या सुशांत दाशाळने वाचन स्पर्धेत, वैष्णवी हजामने लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. सारिका करडे यांनी निकाल जाहिर केला. भक्ती करकरे यांनी सूत्रसंचालन केले. विनोद ओसवाल यांनी आभार मानले. उपाध्यक्ष डॉ. शुभांगी खारकांडे यांनी शुभेच्छा दिल्या.

लोकमत

# शिक्षणाला कौशल्याची जोड द्या : महेश काकडे

## शाहू महाविद्यालयात पारितोषिक वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**रुकडी माणगाव** : नव्या जगाचे आव्हान पेलण्यासाठी पारंपरिक, जुनी साधने उपयोगी पडत नाहीत. येणाऱ्या काळात कशा प्रकारच्या नोकऱ्या असतील सांगता येत नाही. त्यामुळे शिक्षणाला कौशल्याची जोड दिली तर जीवन सुखकर होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक महेश काकडे यांनी केले.

येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात गुणी विद्यार्थी गौरव आणि पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्टच्या अध्यक्षा, माजी खासदार निवेदिता माने होत्या.

निवेदिता माने म्हणाल्या, बाहेरच्या जगात धाडसाने उभा राहता आले पाहिजे. समाजातील समस्यांविषयी जागरुक असले पाहिजे.

यावेळी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्ताने प्रकाशित केलेल्या 'विचारगंध' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर कै. संभाजीराव माने स्मृती राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या विजय आनंदा चौगुले (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), द्वितीय काजल गवळी (राजर्षी शाहू), तृतीय पंकज शंकर मोरे व अलिशा अनिल मोहिते यांना बक्षीस देण्यात आले. प्राचार्य डॉ. अर्जुन राजगे यांनी स्वागत केले. डॉ. प्रशांतकुमार कांबळे यांनी आभार मानले. डॉ. माधवी सोळांकुरकर यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# वि. स. खांडेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयातर्फे वि. स. खांडेकर यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त संग्रहालयातील त्यांच्या अर्धपुतळ्यास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी 'वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय : एक दृष्टिक्षेप' या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. माहितीपटाची संकल्पना, निर्मिती राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे उदयसिंह राजेयादव यांची असून लेखन, दिग्दर्शन, निवेदन अभिजित सोकांडे, अमृता कुलकर्णी, कॅमेरामन- कृष्णात कांबळे, संकलन- सूरज कांबळे यांचे आहे. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, केशव केंगळे, धैर्यशील राजेभोसले, दिग्विजय राजेभोसले, पूनम सुतार, मंगल लोहार, अरविंद पाटील, सुदर्शन उपलंचवार, डॉ. रामेश्वर कांबळे, डॉ. रेश्मा दिवेकर, डॉ. सुचेता औंधकर यांच्यासह विद्यार्थी, साहित्यप्रेमी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 7 Jan 15, 2019
Powered by: erelego.com